no mom

(1)

रद्दा: 1500(जन-821/7.1.2000)-एमसी

बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र. एमओएम/1653 दि.07.01.2000

विषय : सोमवार व शुक्रवार या दिवशी अधिका-यांनी नागरिकांना भेटण्यासाठी वेळ निश्चित करण्याबाबत.

महानगरपालिका आयुक्तांचे असे आदेश आहेत की सर्व उप आयुक्त, खाते प्रमुख व विभाग अधिकारी यांनी प्रत्येक आठवडयातील सोमवार व शुक्रवार या दिवशी दुपारी 3 ते 5 ही वेळ नागरिकांना भेटण्यासाठी राखून ठेवावी. सदर वेळेत त्यांनी नागरिकांना आगाऊ भेटीची वेळ ठरविली नसली तरी भेटावे.

उपरोक्त दिवशी (नमूद केलेल्या वेळेमधे) आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उप आयुक्त कोणतीही बैठक शक्यतो आयोजित करणार नाहीत व सदर वेळेत ते देखील नागरिकांना पूर्वसंमतीविना भेटतील.

मात्र काही अपरिहार्य कारणास्तव आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी उपरोक्त दिवशी उप आयुक्त, खाते प्रमुख व विभाग अधिकारी यांना तातडीच्या बैठकीसाठी बोलाविल्यास संबंधितांनी आपल्या त्या दिवशीच्या नागरिकांसाठी उपलब्ध न राहण्याबाबतची नोटीस आपापल्या कक्षाबाहेर लावावी. मात्र खाते प्रमुख, विभाग अधिकारी यांनी अशा वेळी आपल्या निकटच्या निम्नतम अधिका-यांना नागरिकांना भेटण्यास उपस्थित राहण्यास सांगावे.

उपरोक्त सूचनांची नोंद घेऊन त्यांचे काटेकोरपणे पालन केले जावे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- 5.1.2000 | सही/-5.1.2000 | सही/- 5.1.2000 | सही/- 5.1.2000 |
| (दि.वा.देशपांडे) | (श.शं. महाडदळकर) | (एस.वी.पाटील) | (अजित कुमार जैन) |
| रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्तांचे कार्यालय) | प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) |

सामान्य प्रशासन विभाग,
म.न.पा.आयुक्तांचे कार्यालय,
क्र.एमओएम/1653
दि.07.01.2000

साप्र/11
1999-2000

प्रत ------------------------------------------------यांना
( अधिक प्रतींसह) माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

[signature] 7/1/2000

रचना व कार्यपध्दती अधिकारी
(आयुक्तांचे कार्यालय)